# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ०१-२३ दिनांक ०१/०१/२०२३

## ३१ डिसेंबरच्या दिवशी मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रात दारु पिऊन गाडी चालवणाऱ्या १७० वाहन चालकांवर कारवाई

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नवीन वर्षाचे स्वागतासाठी नागरिक मोठया प्रमाणात ३१ डिसेंबरच्या रात्री जल्लोष साजरा करीत असतात. त्याकरिता बरेच नागरिक रात्री उशीरा रस्त्यावर येत असल्याने मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उप आयुक्त, सर्व सहा.पोलीस आयुक्तांचे देखरेखेखाली एकुण २५० पोलीस अधिकारी, १२०० पोलीस अंमलदार, २५० होमगार्ड व ३०० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान बंदोबस्त व नाकाबंदीकामी रात्रभर तैनात करण्यात आले होते.

सदर दिवशी पुर्ण आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये दारु पिऊन वाहन चालविणाऱ्या १७० वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे ३१ डिसेंबरच्या दिवशी आनंदोत्सव साजरा करताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांनी चोख बंदोबस्त पार पाडला आहे.



--------------ooooo-------------